# || श्री परशुराम प्रसन्न ||

चित्पावन मोडक कुलन्यासातर्फे अखिल भारतीय मोडक-विनोद कुलसम्मेलन आयोजित करण्यात आले होते. यंदाच्या संमेलनाचे यजमानपद ठाणे-मुलुंडस्थित मोडक-विनोद कुटुंबियांनी स्विकारले होते. हे सम्मेलन, रविवार, एप्रिल २३, २०१७, रोजी, ठाणे (पूर्व) येथील मंगला हायस्कूलच्या सभागृहात संपन्न झाले.

ठाण्यातील ज्येष्ठ वास्तुविशारद, श्री. वि. वि. मोडक, यांना प्रमुख पाहुणे म्हणून निमंत्रित केले होते. कुलन्यासाचे अध्यक्ष श्री. श्रीधर मोडक, कार्यवाह श्री. रमेश मोडक आणि कोषाध्यक्ष श्री. अरविंद मोडक या प्रसंगी हजर होते. मुंबई व उपनगरातील कुटुंबियांखेरीज, पेण, पुणे, नागपूर, बडोदा, इंदौर, उज्जैन येथील मंडळींची उपस्थितीही लक्षणीय होती. एकूण २५० मोडक व विनोद या सम्मेलनात सहभागी झाले.

प्रथम लेझिमच्या तालावर प्रमुख पाहुण्यांचे स्वागत केले गेले. त्यानंतर दीपप्रज्वलन होऊन कार्यक्रमास सुरूवात झाली. "अशा सम्मेलनांमुळे समाज सुसंघटित व्हायला मदत होते", असं मत श्री. वि. वि. मोडक यांनी त्यांच्या भाषणात व्यक्तं केलं.

सम्मेलनाच्या निमित्ताने 'नवरसधारा' या नवरसावर आधारित नृत्य-नाट्य-संगीताच्या कार्यक्रमांचं आयोजन केलं होतं. यात हौशी कलाकारांबरोबर प्रथितयश कलाकारही बडेजाव न बाळगता सहभागी झाले होते. नव्या पिढीतील गायक श्री. आदित्य मोडक यांनी, सौ. सुप्रिया मोडक-जोशी व श्री. पुष्कराज जोशी यांच्या साथीने, गणेशवंदना सादर केली. 'कॉमेडी एक्स्प्रेस' या कार्यक्रमातून प्रसिद्धीस आलेल्या सौ. मीरा मोडक यांनी "व्हय, मी सावित्री" या एकपात्री चरित्रनाट्यामधील प्रवेश सादर केला. एफ्.एम्. गोल्ड वाहिनीवरील रेडिओ-जॉकी अनघा मोडक यांची मुलाखत घेतली गेली. कॅंडिड फोटोग्राफीविषयी एक सादरीकरण सौ. वीणा मोडक-गोखले यांनी प्रस्तुत केलं. तसेच श्री. शंकर मोडक यांनी "ह्युमन ओरिएंटेशन सायन्स" या विषयाची ओळख करून दिली.

श्री. श्रीधर मोडक यांनी कुलन्यासाच्या गतवर्षीच्या कामांचा आढावा घेतला. कुलन्यासाच्या सदस्यांचा संकेतस्थळावरील सहभाग कसा वाढवता येईल हे न्यासापुढील एक उद्दिष्ट असेल असं ते म्हणाले.

ठाण्यातील सौ. अपर्णा व श्री. प्रसाद मोडक या दाम्पत्याच्या पुढाकाराने आणि ठाणे-मुलुंडमधील मोडक-विनोद कुटुंबियांच्या सहकार्याने, हे सम्मेलन सुविहितपणे पार पडले.